# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे

फोन.नं. ०२२-२९४५१००१

**Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र ७९** **दिनांक- ३१/०३/२०२१**

## चैन स्नॅचींग व बतावणीचे गुन्हे करणाऱ्या आरोपीस अटक करुन लाखो रुपयाचा ऐवज हस्तगत

दि.१२/०१/२०२० रोजी १८.४०वा चे सुमारास फिर्यादी सौ.रेबेका मोजेस चिग या वय ५६ वर्षे, रा.पाचुबंदर,वसई कोळीवाडा वसई हे प्रार्थनेवरुन रस्त्याने पायी चालत येत असताना रमेदी चर्च येथील मोठा क्रॉस च्या पुढे साईदिप बिल्डींग समोर,वसई येथे समोरुन काळया रंगाच्या मोटार सायकल वरुन येणा-या दोन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र जवळ येवून जबरीने खेचून त्यास पकडण्याचा प्रयत्न केला असता अर्धे मंगळसुत्र फिर्यादीच्या हातात आले व सुमारे १,१०,०००/- रु चे अर्धे मंगळसुत्र खेचून घेवून आरोपी हे पळून गेले होते. सदर बाबत वसई पोलीस ठाणे येथे ०६/२०२० भादंविसं.कलम ३९२,३४ प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

नमुद गुन्हयातील आरोपीत यांचा तांत्रीक बाबी व गुप्त बातमीदाराच्या मदतीने माहीती प्राप्त करुन आरोपीत नामे- सादीक कंबर जाफरी ऊर्फ कुपक वय २५ वर्षे रा. शांतीनगर, अन्वर अपार्टमेंट रुम नं ८६५, इराणी पाडा, भिवंडी ता.भिवंडी जि. ठाणे यांस अटक करुन त्यांचेकडे नमुद गुन्ह्याच्या अनुशंगाने विचारपुस केली असता त्याने त्याचे इतर ५ साथीदरांचे मदतीने चैन स्नॅचींगचे गुन्हे केलेची कबुली दिली असता त्याचेकडुन वसई पो.स्टे.- १, नालासोपारा पो.स्टे.-१, अर्नाळा सागरी पो.स्टे.- २, तुळींज पो.स्टे.-२, मणिकपूर -पो.स्टे.२, काशिमीरा पो.स्टे.-२ असे १० गुन्हे उघडकीस आलेले आहेत. तसेच पोलीस बतावणी व गोड बोलून फसवणुक केलेले तुळींज पो.ठाणे-३ व नालासोपारा पो.ठाणे -१ असे एकुण ४ गुन्हे उघडकीस आलेले आहेत. सदर आरोपीकडून एकुण ६,३०,०००/- रु. किंमतीचे सोने व गुन्हे करण्यासाठी वापरलेल्या १,५०,०००/- रु. किंमतीच्या ३ दुचाकी वाहने असा एकुण ७,८०,०००/- रु. चा माल हस्तगत करण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेल्या तिन दुचाकी वाहनापैकी दोन दुचाकी वाहनाबाबत १) पार्क साईट पो.स्टे. गु.र.नं. ९०/२०२१ भादंविसं.कलम ३७९, २) डोबीवली रामनगर पो.स्टे. गु.र.नं. १३५/२०२१ भादंविसं.कलम ३७९ असे गुन्हे दाखल आहेत.

तसेच वर नमुद अटक आरोपीत हा अर्नाळा सागरी पो.स्टे.चे २ गुन्हयात, वसई पो.स्टे.चे २ गुन्हयात व नालासोपारा पो.स्टे.चे १ गुन्हयात पाहिजे आरोपी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

**सदरची कारवाई डॉ. श्री. महेश पाटील पोलीस उप आयुक्त (गुन्हे) व श्री. राजेंद्र देशमुख सहा पो.आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, श्री शाहुराज रणवरे,पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा -२ सपोनि/सुहास कांबळे, सफौ./महादेव वेदपाठक, पो.हवा./मंगेश चव्हाण, पो.हवा/संजय नवले, पो.हवा./रमेश भोसले, पो.हवा./विकास यादव, पो.ना./रमेश अलदर, पो.ना./प्रशांत पाटील, पो.ना./१७७१ अमोल तटकरे, पो.ना./प्रशांत ठाकुर, पो.कॉ./११८७ शरद पाटील व पो.कॉ./१७९६ अमोल कोरे यांनी केली आहे.**

Scanned with CamScanner